**मे. शारदा श्री इस्पात लिमिटेड या कंपनीद्वारे भूखंड क्र. ई-१४ (एमआयडीसी बुटीबोरी) आणि सर्व्हे क्रमांक ६७ व ७० बी, मौजा-किन्ही, बुटीबोरी, जि.नागपूर येथे बिलेटस-३,०२,६६४ मेट्रीक टन प्रतीवर्ष, टीएमटी-७२,००० मेट्रीक टन प्रतीवर्ष, स्प्रिंग स्टील फ्लॅट-६०,००० मेट्रीक टन प्रतीवर्ष, वायर रॉड कॉईल- ६०,००० मेट्रीक टन प्रतीवर्ष आणि मिश्र धातु पोलादच्या कोपरा/गोल कोपरा चौरस- ४८,००० मेट्रीक टन प्रतीवर्ष या उत्पादनासाठी प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्त दि. ०८/०९/२०२३.**

*******

केंद्र शासनाच्या वने व पर्यावरण विभागाच्या अधिसूचना दि.१४.०९.२००६ व सुधारीत अधिसूचना दि. ०१.१२.२००९ मे. शारदा श्री इस्पात लिमिटेड या कंपनीद्वारे भूखंड क्र. ई-१४ (एमआयडीसी बुटीबोरी) आणि सर्व्हे क्रमांक ६७ व ७० बी, मौजा-किन्ही, बुटीबोरी, जि.नागपूर येथे बिलेटस-३,०२,६६४ मेट्रीक टन प्रतीवर्ष, टीएमटी-७२,००० मेट्रीक टन प्रतीवर्ष, स्प्रिंग स्टील फ्लॅट- ६०,००० मेट्रीक टन प्रतीवर्ष, वायर रॉड कॉईल- ६०,००० मेट्रीक टन प्रतीवर्ष आणि मिश्र धातु पोलादच्या कोपरा/गोल कोपरा चौरस- ४८,००० मेट्रीक टन प्रतीवर्ष या उत्पादनासाठी प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दिनांक ०८/०९/२०२३ रोजी सकाळी ११.३० वाजता प्रकल्पाचे स्थळ मे. शारदा श्री इस्पात लिमिटेड, भूखंड क्र. ई-१४ (एमआयडीसी बुटीबोरी) आणि सर्व्हे क्रमांक ६७ व ७० बी, मौजा-किन्ही, बुटीबोरी, जि.नागपूर येथे श्री. सुभाष चौधरी, निवासी उपजिल्हाधिकारी, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. श्रीमती. हेमा देशपांडे, प्रादेशिक अधिकारी, नागपूर हे म.प्र.नि.मंडळाचे प्रतिनिधी तथा लोक सुनावणी समितीचे सदस्य उपस्थित होते व श्री. अतुल सातफळे, उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-२ यांनी समन्वयक म्हणून काम केले व अध्यक्षांच्या संमतीने सकाळी ११.३० वाजता पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीची कार्यवाही सुरू केली. पर्यावरण विषयक लोक सुनावणीच्या वेळी उपस्थित असलेल्या लोकांच्या नावांची यादी सोबत जोडत आहोत. **(सहपत्र-१).**

## पार्श्वभूमी

शारदा श्री इस्पात लिमिटेड, ही भारतीय कंपनी कायदा १९५६ अंतर्गत नोंदणीकृत कंपनी स्थापित होणार आहे. कंपनी मूलभूत लोह आणि पोलाद निर्मितीचा व्यवसाय करणार असून, तिचा भूखंड क्रमांक-ई-१४ (एमआयडीसी बुटीबोरी) आणि सर्व्हे क्रमांक ६७ आणि ७० बी, मौजा-किन्ही, बुटीबोरी, जिल्हा नागपूर, राज्य-महाराष्ट्र वर स्थित असेल. या कंपनीकडुन १९८.७५ कोटी रूपयांच्या गुंतवणुकीसही भारतातील क्षेत्रांसाठी आवश्यक असलेले मुलभूत लोह आणि पोलाद पुरविले जाईल.

कंपनी १९८.७५कोटी रूपयांच्या गुंतवणुकीतून उत्पादन क्षमता युनिट ३,०२,६६४ मेट्रिक टन/वर्ष, बिलेटस-३,०२,६६४ मेट्रीक टन/वर्ष, टीएमटी-७२,००० मेट्रीक टन/वर्ष, स्प्रिंग स्टील फ्लॅट- ६०,००० मेट्रीक टन प्रतीवर्ष, वायर रॉड कॉईल- ६०,००० मेट्रीक टन/वर्ष आणि मिश्र धातु पोलादच्या कोपरा/गोल कोपरा चौरस- ४८,००० मेट्रीक टन/वर्ष प्रस्तावित करत आहे. शारदा श्री इस्पात लिमिटेडच्या उद्योग ४४,२८० मीटर चौरस जमिनीवर विस्तारित असणार आहे. कंपनी मूलभूत लोह आणि पोलदा निर्मितीच्या सर्वात मोठ्या उत्पादक व्यवसायांपैकी एक असेल. कंपनीची ५० टक्के पेक्षा जास्त उत्पादने जगभरातील परदेशी देशांमध्ये निर्यात केली जातील आणि कंपनीचा ग्राहक आधार यूएसए आणि युरोपीय देशांसारख्या अनेक प्रगत बाारपेठा असणार आहे.

..२/-

कंपनीचे उत्पादन केंद्र भारतातील महाराष्ट्र राज्यात, मौजा किन्ही बुटीबोरी गांव, नागपूर येथे असेल जे रेल्वे स्टेशन आणि विमानतळाजवळ आहे. यामुळे कंपनीचा कच्चा माल आणि तयार झालेले उत्पादन यांची आयात आणि निर्यात करणे सुलभ होणार आहे. कंपनी ISO 9001:2008, IATF 1694] ISO 14001 आणि ISO 45001 मान्यताप्राप्त आहे.

या पर्यावरणीय परिणाम मुल्यमापन अभ्यासाचा उद्देश परिसर आणि प्रस्तावित प्रकल्पामुळे उद्भवू शकणाऱ्या पर्यावरणीय प्रभावाच्या प्रमाणात माहिती प्रदान करणे हा आहे.

**प्रयोजन व कार्यपध्दती**

उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-२ यांनी अध्यक्षांच्या परवानगीने लोकसुनावणी समितीचे सदस्य व उपस्थितांचे स्वागत करून लोकसुनावणीला सुरवात केली.

सर्वप्रथम मा.निवासी उपजिल्हाधिकारी, नागपूर व अध्यक्ष, जन सुनावणी समिती यांनी जाहिर लोकसुनावणी घेण्याबाबतचा उद्देश व त्याची कार्यपध्दती समजावून सांगितली. त्यानुसार या ठिकाणी परवानगी बाबतचा कोणताही निर्णय घेण्यात येणार नाही असे स्पष्ट केले. या जाहिर लोक सुनावणीमध्ये घेण्यात येणाऱ्या आक्षेपांची नोंद घेणे व शासनास पाठविणे एवढेच काम ही समिती करेल. त्यामुळे उपस्थित जनतेला या प्रकल्पाबाबत त्यांच्या सूचना, टिका, टिप्पणी, निवेदने व आक्षेप घ्यावयाचे असतील तर या ठिकाणी तोंडी मांडावयाचे आहेत त्याची नोंद घेतली जाईल व शासनास पाठविण्यात येईल असे सांगितले.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-२ यांनी भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या अधिसूचना क्र. **SO 60 (E) dtd. 27th Jan. 1994** व सुधारणा दिनांक १४ सप्टेंबर, २००६ नुसार लोकसुनावणी घेण्याचे प्रयोजन विशद आहे. तसेच त्यामधील तरतुदीनुसार दिनांक ०५/०८/२०२३ ला दैनिक हितवाद (इंग्रजी) व दैनिक नवराष्ट्र (मराठी) या दोन मोठ्या प्रमाणात वितरीत होत असलेल्या स्थानिक वृत्तपत्रात या पर्यावरण विषयक लोकसुनावणीबद्दल जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आली आहे त्याबद्दल कळविले. दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या सुचनांच्या वृत्तपत्र कात्रणाची प्रत सोबत जोडली आहे. **(सहपत्र-२)**.

भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या अधिसुचने प्रमाणे प्रकल्पाची ठळक वैशिष्ठे असलेल्या, पर्यावरण आघात मुल्यनिर्धारण अहवालाच्या संक्षिप्त विवरणाची प्रत व इतर माहिती असलेले कागदपत्रे (इंग्रजी व मराठी मध्ये) विविध सरकारी कार्यालयात तसेच ग्रामपंचायत कार्यालयात नागरीकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आलेले होते. जाहिर सूचना प्रसिध्द झाल्यापासून जाहिर सुनावणीच्या तारखेपुर्वी परिसरातील लोकांकडून लिखीत स्वरूपात सूचना, टीका-टिप्पणी व आक्षेप मागविण्यात आलेले होते. जाहीर लोकसुनावणीच्या दिवसापर्यंत एकुण ३ निवेदने म.प्र.नि.मंडळाकडे प्राप्त झाले असुन प्रत सोबत जोडण्यात येत आहे **(सहपत्र-३)**. मंडळाचा आदेश क्र. ई-५८/२०२३ पत्र क्र. BO/JD/(WPC)/PH/B-230808-FTS-0182 dtd. 08/08/2023 नुसार लोक सुनावणी समिती गठीत करण्यात आली. या आदेशाची प्रत सोबत जोडत आहे **(सहपत्र-४)**.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-२ तथा समन्वयक यांनी प्रकल्प धारकाला प्रकल्पाबद्दल व पर्यावरणीय अहवालाबाबत विस्तृत सादरीकरण करण्यास सांगितले. तदनुसार, प्रकल्प धारकाच्या प्रतिनिधीने तपशिलवार स्थानिक भाषेत बिलेटस-३,०२,६६४ मेट्रीक टन प्रतीवर्ष, टीएमटी-७२,००० मेट्रीक टन प्रतीवर्ष, स्प्रिंग स्टील फ्लॅट- ६०,००० मेट्रीक टन प्रतीवर्ष, वायर रॉड कॉईल- ६०,००० मेट्रीक टन प्रतीवर्ष आणि मिश्र धातु पोलादच्या कोपरा/गोल कोपरा चौरस- ४८,००० मेट्रीक टन प्रतीवर्ष या उत्पादनासाठी पर्यावरण विषयक बाबींबाबत प्रकल्प परिसर, प्रस्तावित प्रकल्पाचे लाभ, प्रस्तावित सुविधा, अग्निशामक सुविधा, प्रक्रियेचे विवरण, वातावरणाची माहिती आणि अपेक्षित परिणामांची पडताळणी, जमिनीवरील घटक, वातावरण व हवामान, हवेतील घटक, परिसरातील हवेचा दर्जा, आपत्ती व्यवस्थापन योजना, हवा प्रदूषणाचे स्त्रोत, ध्वनी घटक, जल घटक, उपलब्ध पाण्याचा दर्जा, पाण्याचा वापर, सांडपाण्याची निर्मिती, जैविक घटक, सामाजिक आणि आर्थिक घटक, स्थानिक मूलभूत सोयीसुविधांवर होणार परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन योजना, हवेतील उत्सर्जन, सांडपाणी व्यवस्थापन, वनीकरण कार्यक्रम, काळजी व्यवस्थापन आणि परिक्षण या बाबींवर सादरीकरण केले.

सादरीकरणा नंतर उप-प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, नागपूर-२ यांनी उपस्थित जनसमुदायाला, सदर प्रकल्पाबाबत काही प्रश्न, सुचना, टिका, टिप्पणी आक्षेप सुचवायचे असल्याचे त्यांनी आपले नांव व गावाचे नांव सांगुन मुद्दे उपस्थित करावे, असे आव्हान केले.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिप्पणी, आक्षेप, सुचना तसेच प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालील प्रमाणे आहेत:**

**१) श्री. दिपक मुन, सुकळी, जि.नागपूर.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | सुकळी गावांतील किती लोकांना रोजगारामध्ये प्राधान्य देणार. | सुकळी गावांतील बेरोजगारांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार प्राधान्य देण्यात येईल. |

**२) श्री. मोहन मांढरे, किन्ही, जि.नागपूर.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | स्थानिकांना रोजगार दयावा. | प्रस्तावित कंपनीमध्ये स्थानिकांनाच प्रथम प्राधान्य देण्यात येईल. |

**३) श्री. विक्रम मोहिते, किन्ही, जि.नागपूर.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १. | प्रस्तावित प्रकल्पामध्ये अभियंता या पदाचे काम राहील काय. | प्रस्तावित प्रकल्पामध्ये अभियंता या पदाचे काम निश्चितच राहील. |

..४/-

४) श्री. आतीश उमरे, जि.प.सदस्य, किन्ही, जि.नागपूर

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | सिएसआर निधी किन्ही गावांसाठी वापरणार काय, किन्ही गावांतील नागरीक पिण्याचा पाण्याचा वापर विहिरीद्वारे करतात. आपण किन्ही गावास पाण्याचा पुरवठा करणार काय. | कंपनीद्वारे किन्ही गावास आवश्यक ती मदत करण्यात येईल. |
| २ | औद्योगिक वसाहतीमुळे गावांतील विहिरीचे पाणी दुषित होतात. | यावर समन्वयक यांनी सांगितले की, हा विद्यमान व प्रस्तावित प्रकल्प हवा प्रदूषणकारी आहे, जल प्रदूषणकारी नाही. |

५) श्री. सुनिल ठाकरे, किन्ही, जि.नागपूर

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक/मप्रनि मंडळ यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | प्रस्तावित प्रकल्पामुळे आरोग्यास धोका राहील काय | प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, प्रकल्पामुळे आरोग्यास धोका राहणार नाही, याची योग्य काळजी घेतल्या जाईल. |

६) श्री. संजय नगरारे, किन्ही, जि.नागपूर

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक/मप्रनि मंडळ यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | किन्ही गावांस पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणार काय. | टँकरची व्यवस्था केल्यास पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात येईल. |

७) श्री. सारंग कळवे, किन्ही, जि.नागपूर

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक/मप्रनि मंडळ यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | माझ्या दुकानामधुन सामान घेणार काय | कंपनी व्यवस्थापनाची मान्यता मिळाल्यास सामान घेण्यास हरकत नाही. |

८) श्री. वैभव खोब्रागडे, किन्ही, जि.नागपूर

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक/मप्रनि मंडळ यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | गावांतील जनावरांच्या सुरक्षेकरीता संरक्षक भिंतीचे बांधकाम करावे, जेणेकरून जनावरे कंपनीच्या आवारात येणार नाही. | जनावरे कंपनीच्या आवारात येणार नाही, या करीता संरक्षित भिंतीचे बांधकाम करण्यात येईल. |

९. श्री. रामभाऊ वझे, सालईधाबा, जि.नागपूर

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक/मप्रनि मंडळ यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | कंपनीच्या ४० मीटर उंचीच्या धुराड्यांमुळे किन्ही गावाला प्रदूषणाचा धोका राहणार काय? | हवा प्रदूषणाकरीता बॅग फिल्टर ही हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा उभारण्यात येईल व म.प्र.नि.मंडळाने नेमून दिलेल्या हवा प्रदूषण पातळी १५० मायक्रोग्रॅम/धनमीटर पेक्षा कमी राहील. त्यामुळे प्रदूषणाचा धोका राहणार नाही तसेच गावांमध्ये आरोग्य शिबीर घेण्यात येईल. |

श्रीमती.हेमा देशपांडे, सदस्या, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नागपूर यांनी प्रकल्प प्रवर्तकास विचारणा केले की, जनसुनावणीमध्ये पाण्याचे स्त्रोत बरोबर नाही, हा प्रश्न उपस्थित झालेला असुन आपण कुठले-कुठल्या जागेवरून पाण्याचे नमुने संकलित केले त्याबाबतची माहिती सादरीकरणाद्वारे पुन्हा सांगावी.

यावर प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, ४ ठिकाणी पाण्याचे नमुने घेतलेले असुन ते विहित मर्यादेत आहेत. ज्यामध्ये वेणा नदी, तलाव व कान्होलीबारा येथील भूजलाचे पाण्याचे स्त्रोत संकलित करण्यात आलेले होते.

**मा. निवासी उपजिल्हाधिकारी तथा अध्यक्ष लोकसुनावणी समिती.**

यांनी सदर प्रकल्पाबाबत उपस्थित नागरिकांच्या प्रश्नांची व प्रकल्प प्रस्तावकांच्या उत्तराची उजळणी केली. तसेच प्रकल्प प्रवर्तकांनी जास्तीत जास्त स्थानिकांना रोजगार उपलब्ध करावा, परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करावी, अद्यावत प्रदूषण नियंत्रण व्यवस्था बसवावी याबाबत सूचना केल्या. उप-प्रादेशिक अधिकारी यांनी उपस्थित जनतेचे, पत्रकार, स्थानिक लोकप्रतिनिधी इ. या जनसुनावणीस सहकार्य केल्याबद्दल आभार मानले, माननीय अध्यक्ष यांच्या परवानगीने ही जाहिर लोकसुनावणी संपली असे जाहिर करण्यात आले.

(अतुल सातफळे)
समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नागपूर-२

(हेमा देशपांडे)
सदस्या, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ,

(सुभाष चौधरी)
अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
निवासी उपजिल्हाधिकारी, नागपूर

**MINUTES OF THE ENVIRONMENTAL PUBLIC HEARING OF PROPOSED STEEL MANUFACTURING BILLETS-302664 MT/YEAR, TMT BAR- 72000 MT/YEAR, SPRING STEEL FLAT – 60000 MT/YEAR, WIRE ROD COIL- 60000 MT/YEAR & ALLOY STEEL, ROUND/ROUND CORNERED SQUARE CAPACITY- 48000 MT/YEAR OF M/S. SHARDA SHREE ISPAT LTD., PLOT NO. E-14 (MIDC BUTIBORI) & SURVEY NO. 67 & 70/B, MOUZA-KINHI, BUTIBORI, DIST.NAGPUR DTD. 08/09/2023.**

As per Ministry of Environment and Forest, Govt. of India Notification dated 14.09.2006 amended notification dated 1.12.2009. M/s. Sharda Shree Ispat Ltd., Plot No. E-14 (MIDC Butibori) & Survey No. 67 & 70/B, Mouza-Kinhi, Butibori, Dist.Nagpur Environmental Public Hearing in respect of proposed steel manufacturing Billets-302664 MT/Year, TMT Bar- 72000 MT/Year, Spring Steel flat – 60000 MT/Year, Wire rod coil- 60000 MT/Year & Alloy steel, round/round cornered square capacity- 48000 MT/Year held at Project site M/s. Sharda Shree Ispat Ltd., Plot No. E-14 (MIDC Butibori) & Survey No. 67 & 70/B, Mouza-Kinhi, Butibori, Dist.Nagpur under the Chairmanship of Shri. Subhash Chaudhary, Residential Deputy Collector. Smt. Hema Deshpande, Regional Officer, M.P.C.Board, Nagpur attended as a member of the public hearing panel, and Shri. Atul Satfale, Sub-Regional Officer, M.P.C.Board, Nagpur-II act as a convener. The Public Hearing started at 11.30 am with the permission of the Chairman of the Public Hearing Panel. Attendance of the People present during the Public Hearing is attached as **Annexure-I.**

**BACKGROUND :**

Sharda Shree Ispat Ltd, will form an establish company registered under Indian Company Act, 1956, will be carrying the manufacturing business of basic iron & steel, it proposes a plant that will located at Plot No. E-14 (MIDC Butibori) and Survey No. 67 & 70/B, Mouza-Kinhi, Butibori, Dist.Nagpur, State-Maharashtra. To cater the basic iron & steel requirements for sectors in India with an investment of Rs. 198.75 Crore.

The plant is going to propose 3,02,664 MT/Year Billets, 72,000 MT/Year TMT, 60,000 MT/Year Spring Steel Flat, 60,000 MT/Year Wire Rod Coil and 48,000 MT/Year alloy steel round/round cornered square capacity with an investment of Rs. 198.75 Crore. The Sharda Shree Ispat Ltd industry will spread over 44,280 m$^2$ of land. It will be one of the largest manufacturers of Basic Iron & Steel. More than 50% of the Company's products will be exporting to overseas countries worldwide and it will have a customer base in many advanced markets such as USA, and European countries.

The company's manufacturing facilities will be locating at Village Mouza-Kinhi, Butibori, Nagpur in the State of Maharashtra, India, which will be close to Railway Station & Airport. This will provide the company with easy access to import & export of the raw materials and finished good. The Company is an **ISO 9001:2008, IATF 1694, ISO 14001 and ISO 45001** accredited. The purpose of this Environmental Impact Assessment (EIA) study is to provide information on the surroundings and the extent of environmental impact likely to arise on account of the proposed project.

**PURPOSE AND PROCEDURE:**

With the permission of Chairman of Public Hearing, the Sub-Regional Officer, MPCB, Nagpur-II has started Public Hearing by welcoming the Chairman and Member of the public hearing panel, local citizens from the village and others.

The Chairman of Public Hearing Panel informed that, the Public Hearing is conducted for recording the views/objects/suggestions of the participants regarding the project, and same is communicated to the Government. Chairman also clarified that this panel is not here to take decision for accordance of any approval to the project and appealed the participants to express their views and suggestion.

Sub-Regional Officer, MPCB, Nagpur-II explained the purpose of conducting this public hearing that as per MoEF, GOI Notification SO 60(E) of 27th January, 1994 and amended on 14th September, 2006. The notices for the public hearing was published in two local widely circulated Newspapers i.e. the 'Hitavada' (English) and 'Navrashtra' (Marathi) on 05/08/2023. Copies of the same are enclosed as **Annexure-II.**

Copies of the executive summary / EIA containing salient features of the project & EIA both in English and in Marathi and other information/documents were made available to the public by making these documents available in various Govt. offices as well as local Gram Panchayat as per MoEF GOI Notification. Suggestions, comments and objections of the public were called in writing during the notice period of the publication of the notice. The public hearing panel was constituted vide MPC Board Office Order No. E-58/2023 vide letter No. BO/JD/(WPC)/PH/B-230808-FTS-0182 dtd. 08/08/2023. Copy of the same is enclosed as **Annexure-III.** However, online queries were not received. During public hearing MPCB has received 3 representation regarding support to this proposed project, copies are enclosed as per **Annexure-IV.**

Thereafter, Sub-Regional Officer, Nagpur-II and Convener requested the project proponent to give their detail presentation about the project and the Environmental issues related with it. Accordingly, representative of the project proponent gave detailed power point presentation of the project in local language as under. Project proponent has given information regarding project undertake by M/s. Sharda Shree Ispat Ltd., Plot No. E-14 (MIDC Butibori) & Survey No. 67 & 70/B, Mouza-Kinhi, Butibori, Dist.Nagpur for proposed steel manufacturing Billets-302664 MT/Year, TMT Bar- 72000 MT/Year, Spring Steel flat – 60000 MT/Year, Wire rod coil- 60000 MT/Year & Alloy steel, round/round cornered square capacity- 48000 MT/Year. He further explained regarding project location, benefits of proposed project, proposed facilities, fire fitting facilities, process description, description of environment and identification of anticipated impact, Land environment, climate and meteorology, Air Environment, existing water quality, water consumption, biological environment, socio-economic environment, impact on local infrastructure, environment management plan, air emission, preventive maintenance / inspection.

..3/-

Sub-Regional Officer & Convener Shri. A.P.Satfale has requested the citizens as well as the present public to express their views, comments, concern & suggestion for this proposed project.

**FOLLOWING MEMBERS HAVE PARTICIPATED IN PUBLIC HEARING AND RAISED QUESTIONS/COMMENTS/SUGGESTIONS. THE DETAILS ARE GIVEN BELOW;**

**1) Shri. Deepak Moon, Sukli, Dist-Nagpur.**

| Sr. No. | Objections/Suggestion/Question | Comments/ made by Project Proponent. |
|---|---|---|
| 1 | How many peoples of Sukli villages will be given priority in employment. | Preference will be given to the unemployed in Sukli villages according to their educational qualification. |

**2) Shri. Mohan Mandhare, Kinhi, Dist-Nagpur.**

| Sr. No. | Objections/Suggestion/Question | Comments/ made by Project Proponent. |
|---|---|---|
| 1. | Give employment to locals. | Locals will be given first priority in the proposed project. |

**3) Shri. Vikram Mohite, Kinhi, Dist-Nagpur.**

| Sr. No. | Objections/Suggestion/Question | Comments/ made by Project Proponent. |
|---|---|---|
| 1. | Whether the post of Engineer will remain in the proposed project. | The post of Engineer will definitely remain in the proposed project. |

**4) Smt. Aatish Umare, ZP Member, Kinhi, Dist-Nagpur.**

| Sr. No. | Objections/Suggestion/Question | Comments/ made by Project Proponent. |
|---|---|---|
| 1. | Will the CSR funds be used for Kinhi village, Citizens of some villages use drinking water through wells. Will you supply water to any village? | Kinhi village will be provided necessary assistance by the company. |

**5) Shri. Sunil Thakre, Kinhi, Dist-Nagpur..**

| Sr. No. | Objections/Suggestion/Question | Comments/ made by Project Proponent / MPCB. |
|---|---|---|
| 1 | Will the proposed project pose a health hazard? | The project proponent said that due care will be taken to ensure that the project does not pose any health hazard. |

**6) Shri. Sanjay Nagrare, Kinhi, Dist-Nagpur.**

| Sr. No. | Objections/Suggestion/Question | Comments/ made by Project Proponent / MPCB. |
|---|---|---|
| 1 | Will drinking water be provided to Kinhi villages? | Drinking water will be supplied, if tankers are arranged. |

**7) Shri. Sarang Kalwe, Kinhi, Dist-Nagpur.**

| Sr. No. | Objections/Suggestion/Question | Comments/ made by Project Proponent / MPCB. |
|---|---|---|
| 1 | Will you buy stuff from my shop. | There is no problem in taking the goods if the company management approved. |

8) **Shri. Vaibhav Khobragade, Kinhi, Dist-Nagpur.**

| Sr. No. | Objections/Suggestion/Question | Comments/ made by Project Proponent / MPCB. |
|---|---|---|
| 1 | A protective wall should be constructed for the safety of the animals in the villages, so that the animals do not enter the premises of the company | A protected wall will be constructed to prevent animals from entering into the premises of the company. |

9) **Shri. Rambhau Vaze, Salaidhaba, Dist-Nagpur.**

| Sr. No. | Objections/Suggestion/Question | Comments/ made by Project Proponent / MPCB. |
|---|---|---|
| 1 | Will there be a risk of pollution to any villages due to the company's 40 meter height of chimney? | Air pollution control system such as bag filter will be provided to control air pollution and the air pollution level will be less than 150 Mg/Nm3 as prescribed standard by MPCB. So, there will be no risk of pollution and health camps will be conducted in villages. |

**Smt. Hema Deshpande, Member of Environment public hearing and Regional Officer, M.P.C.Board, Nagpur** asked the project proponent that, in the public hearing, the question that the source of water is not correct has been raised and the information about the places from where water samples have been collected should be repeated through the presentation.

On this, the project proponent said that, water samples have been taken at 4 places and they are within the prescribed limits. In which the sources of groundwater from Vena river, Lake and Kanholibara were collected

**Residential Deputy Collector, Nagpur & Chairman of Public Hearing Panel.**

Shri. Subhash Chaudhary, Residential Deputy Collector, Nagpur & Chairman of public hearing panel, summarized the questions and queries raised by the people present for public hearing and replies given by project proponent. Chairman suggested that, the project proponent shall provide adequate employment to the local residents, large scale tree plantation drive shall be taken, and project proponent shall install up to date pollution control arrangements. Sub-Regional Officer, MPCB, Nagpur extended vote of thanks to the local people, media persons, local people's representative etc. for their extended support to the public hearing. The public hearing was concluded with the permission of chair.

| | | |
|---|---|---|
| **(Atul Satfale)**<br>**Sub-Regional Officer-II, MPC Board, Nagpur & Convener of the Public Hearing Panel** | **(Hema Deshpande)**<br>**Regional Officer, MPC Board, Nagpur & Member of the Public Hearing Panel** | **(Subhash Chaudhary)**<br>**Residential Deputy Collector, Nagpur & Chairman of the Public Hearing Panel** |